*(A High Impact Factor, Quarterly, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)*

*NAVJYOT / Vol. X / Issue – IV* *ISSN 2277-8063*

# आहिताग्नि राजवाडे यांची धर्म चिकित्सा

**विशाल व्यंकट रणखांब**, संशोधक विद्यार्थी (पीएच.डी), राज्यशास्त्र विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.

मानवी जीवनात धर्माचे स्थान अनन्यसाधारण आहे. देशातील सामाजिक व राजकीय स्थैर्य ज्या अनेक घटकांवर अवलंबून असते, त्या घटकांपैकी एक प्रमुख घटक म्हणजे, धर्म होय. धर्म हा मानवी मनाच्या व्यवहारातून निर्माण झाला. त्यामुळे धर्मसंस्था नसलेला समाज सहसा आढळत नाही. प्राचीन काळापासून ते आजच्या प्रगत वैज्ञानिक युगापर्यंत धर्माने आपले अस्तित्व टिकवून ठेवले आहे. धर्मामुळे माणसे एकमेकांच्या जवळ आली. त्यातूनच त्यांनी आपली प्रगती करायला सुरुवात केली. आपल्या जीवनात येणाऱ्या प्राथमिक स्वरुपाच्या अडचणी मानव धर्माच्या सहाय्याने सोडवू लागला. त्यामुळे धर्म हे सामुदायिक विचारांचे अधिष्ठान झाले. सामुदायिक विचार हा मानवाच्या संघप्रियतेतून निर्माण झाला. जन्मापासून मृत्यूपर्यंत मानव समाजातच राहत असतो. धर्माने विश्वाचे आदिकारण किंवा उत्पादक ईश्वराला मानले आहे. विश्वात असणारी नियमबद्धता, सुव्यवस्थितपणा पाहून या रचनेमागे कोणीतरी असणार अशा भावनेने त्याने ईश्वराची कल्पना केली. ईश्वराला त्याने सर्वशक्तिमान, सर्वज्ञ, कृपाळू, दयाळू असे मानले. पण सर्व धर्मसंप्रदायामध्ये ईश्वराचे अस्तित्व स्वीकारले आहे असे नाही.

कालपरत्वे, देशपरत्वे धर्मसंस्थेचे रूप पालटत गेले. आज धर्मसंकल्पनांमध्ये परस्परविरोध दिसतो. काही धर्म ईश्वराचे अस्तित्व मानतात तर काही धर्म ईश्वराचे अस्तित्व मानत नाहीत. काही धर्म एकेश्वरवादी आहेत, तर काही धर्म अनेकेश्वरवादी आहेत. ईश्वरासंबंधीच्या कल्पनादेखील परस्परांना छेद देणाऱ्या ठरतात. काही धर्म ईश्वरास पित्यासमान दयाळू मानतात तर काही धर्म त्यास करारी पित्याच्या स्वरुपात पाहतात. काही धर्म देवाला निराकार परंतु सगुण मानतात तर काही धर्म देवाला निर्गुण, निराकार समजतात. मूर्तीपूजा तर धर्मक्षेत्रातील एक विवाद्य विषय बनलेला आहे. काही धर्मांनी मूर्तीपूजेचा पुरस्कार केला, तर काही धर्मांनी मूर्तीपूजेचा तीव्र तिरस्कार केला. विविध धर्मांचा एकत्रित विचार केल्यास त्यातील मूलगामी मतभेद स्पष्ट होतात. इतकेच नव्हे, तर काही विचारवंतांनी धर्मास आवश्यक मानले तर काहींनी त्यास अनावश्यक ठरविले. मध्ययुगातील युरोपमध्ये घडलेला धर्मसत्ता व राजसत्ता यांच्यातील संघर्ष सर्वांना परिचित आहेच. सर्वप्रथम मॅकेयाव्हेली (१४६९-१५२७) या इटालियन विचारवंताने धर्माची राजकारणापासून फारकत केली. थॉमस हॉब्ज (१५८८-१६६९) यांनीदेखील धर्मसंस्था राज्यसंस्थेपेक्षा वेगळी मानली. कार्ल मार्क्स (१८१८-१८८३) यांनी धर्म म्हणजे अफूची गोळी असे स्पष्ट करून राजकारणापासून धर्म वेगळा करण्याचा प्रयत्न केला. तर, इमॅन्युअल कांट (१७२४-१८०४), हेगेल (१७७०-१८३१), टी. एच. ग्रीन (१८३६-१८८२), महात्मा गांधी (१८५९-१९४८) यांसारख्या विचारवंतांनी राजकारणाचा धर्म व नैतिकतेशी संबंध जोडण्याचा प्रयत्न केला. आहिताग्नि[१] राजवाडे यांनी धर्म हे मातेच्या अंगावरील दूध आहे. ते विष नाही, अमृत आहे, हे स्पष्ट करून राजकारणापासून धर्म अलग करणे अहिताचे आहे, असे प्रतिपादन केले. (राजवाडे; १९८०:२५८-२५९)

आहिताग्नि शंकर रामचंद्र राजवाडे (१८७९-१९५२) हे एक विस्मृतीत गेलेले व्यक्तिमत्व होय. कारण आजवर काही मोजके अपवाद वगळता त्यांच्या वैचारिक योगदानाकडे कुणी फारसे लक्ष दिलेले दिसत नाही. महाराष्ट्रातील साहित्यिक अभ्यासक आणि विचारक यांनाही त्यांचा विसर पडलेला दिसतो. राजवाडे यांनी आपले संपूर्ण आयुष्य वाचन, लेखन आणि व्याख्याने यांत व्यतित केले. त्यांनी लिहलेल्या गीताभाष्य (१९१६), नासदीयसुक्तभाष्य-पूर्वार्ध (१९२७), नीट्झशेचा ख्रिस्तांतक आणि ख्रिस्तांतक नीट्झशे (१९३१), वैदिकधर्म आणि षड्दर्शने अथवा चार विद्या व सहा शास्त्रे (१९३८), नासदीयसुक्तभाष्य-उत्तरार्थ खंड पहिला (१९३९), सनातन वैदिक धर्मप्रवचनमाला (१९४७), नासदीयसुक्तभाष्य-उत्तरार्ध चरम खंड (१९४९), ईशावास्योनिषदभाष्य (१९४९), षड्दर्शनसमन्वय आणि पुरुषार्थमीमांसा (१९४९), नासदीयसुक्तभाष्य-उत्तरार्ध खंड दुसरा (१९५२), आहिताग्नि राजवाडे आत्मवृत्त (१९८०) आदी ग्रंथातून त्यांचे विचार प्रतिबिंबित झाले आहेत.

१. आहिताग्नि म्हणजे अग्निहोत्री. अग्निहोत्री म्हणजे अग्निहोत्र घेतलेला पुरुष. अग्निहोत्र म्हणजे शास्त्रोक्त अग्नि ठेवून सांजसकाळ होम करण्याचे कर्म. (आपटे; १९६८) आहिताग्नि ही पदवी नव्हे; तर बिरुद आहे. राजवाडे स्वतःस आहिताग्नि म्हणवून घेत.

आहिताग्नि राजवाडे हे केवळ विद्वान म्हणून असामान्य नव्हते, तर व्यक्ती म्हणूनही असमान्य होते. ते एक बहुश्रुत पंडित होते. ते आजन्म ज्ञानोपासक, भाष्यकार, भाषापटू आणि ख्यातनाम वक्ते होते. या धर्मनिष्ठ पुणेकर ब्राम्हणाला धर्म, तत्त्वज्ञान, काम, कला, साहित्य, क्रिडा, शास्त्र, इतिहास, राजकारण इत्यादी विविध विषयामध्ये चांगलाच रस होता.(दीक्षित; २००६: १६०) आपले खरेखुरे विचार निर्भिडपणे आणि प्रामाणिकपणे मांडण्याचे धाडस त्यांच्यामध्ये होते. म्हणूनच आहिताग्नि राजवाडे यांचे धार्मिक विचार चिकित्सात्मक दृष्टीकोनातून मांडणे महत्त्वपूर्ण ठरते.

**आहिताग्नि राजवाडे यांचे धर्मविषयक विचार**

आहिताग्नि राजवाडे यांच्या मते धर्म ही एक व्यापक संकल्पना आहे. धर्माची विशिष्ट स्वरुपाची एकमेव व्याख्याही नाही. प्रत्येक धर्मामध्ये धर्माची व्याख्या अलग आहे. इतकेच नव्हे, तर एकाच धर्मात धर्माच्या अनेक व्याख्या आढळून येतील. 'धर्म' या शब्दाचे इंग्रजीत 'Religion' असे भाषांतर करतात. पण Religion म्हणजे धर्म नाही. Religion हा शब्द देवधर्मविषयक 'Theological' आहे. देवळात जाणे, निरनिराळे धार्मिक आचार पाळणे, इत्यादी अर्थ Religion या शब्दाने प्रतीत होतात. हा शब्द अव्यापक (Narrow) स्वरुपाचा आहे. Re अधिक Ligo, To Bind म्हणजे बंधने घालणारा, निर्बंधने सांगणारा तो Religion होय. बंधने पाळणे, आज्ञा पाळणे हा Religion चा गाभा होय. स्नान, संध्या, नमस्कार इत्यादी बंधनेच होत. पण धर्म या शब्दाची व्याख्या अशी अव्यापक नाही. ती अत्यंत व्यापक आहे. हे तैत्तिरिय अरण्यकातील 'धर्मो विश्वस्थ जगत: प्रतिष्ठा' या व्याख्येतून सूचित होते. यात 'विश्व' व 'जगत्' असे दोन शब्द आले आहेत. यातील मुख्य शब्द विश्व हा होय, जगत् हे त्याचे विशेषण होय. संपूर्ण विश्व हे जगत् म्हणजे गतिमान आहे. त्याची प्रतिष्ठा म्हणजे धर्म होय. प्रतिष्ठा म्हणजे उत्तम स्थिती, प्रकृष्ट स्थिती होय. दृढ स्थिती, पूर्णतेला गेलेली स्थिती, अशी विश्वाची स्थिती म्हणजे धर्म होय. (राजवाडे;१९४७:३८)

आहिताग्नि राजवाडे यांच्या मते, 'जगातील सर्व धर्मांचे दोन प्रमुख भाग केले, तर एक आर्य धर्माचा व दुसरा सेमेटिक धर्माचा असे दोन विभाग होतात. आर्य धर्मात वैदिक, बौद्ध धर्म येतात, तर सेमेंटिक धर्मात यहुदी, ख्रिस्ती, मुसलमानी धर्म येतात. यांपैकी आर्यधर्म हे अनेकदेववादी आहेत. अपवाद बौद्ध धर्म. तर सेमेटिक धर्म हे एकदेववादी धर्म आहेत. (राजवाडे;१९४७:१६-१७) प्रत्येक धर्मातील आचार, विचार, रूढी, प्रथा, परंपरा यांत भिन्नता दिसून येते.

**आर्य धर्म**

आहिताग्नि राजवाडे आर्य धर्माच्या श्रेष्ठत्वाचा पुरस्कार करतात. आर्य म्हणजे, श्रेष्ठ, प्रगतिमान, तेजस्वी. आर्य धर्माचे रहस्य जर्मन फॅसिस्टवीर हिटलर यास उत्तम कळले असल्या कारणाने त्याने आपल्या राजवटीत अग्नीचे प्रतीक मानले आणि आपल्या ध्वजावर स्वस्तिक चिन्ह धारण केले, असा दावा आहिताग्नि राजवाडे करतात. त्यांना आर्य धर्माविषयी विलक्षण अभिमान असल्यानेच ते म्हणतात, 'दुसऱ्या महायुद्धात हिटलरचा विजय झाला असता, तर आज ख्रिस्ती धर्माच्या जागी आर्य धर्माचे निशाण फडकले असते.' (राजवाडे;१९८०:२६३-२६४) इतकेच नव्हे तर राजवाडे आर्यत्वदर्शक 'जी' शब्दाचे श्रेष्ठत्वही वर्णितात. त्यांच्या मते,'जी' हा शब्द हिंदुत्वापलीकडे आर्यत्वदर्शक आहे. तो आर्य = अज्ज = जी असा राजवाडे यांनी व्युत्पादला आहे. जसे, शिवाजी = शिवाज्ज = शिवार्य. असा हा शब्द चार्तुवर्ण्यातील सर्व ब्राह्मणादी वर्णांच्या पुढे लावण्यात येतो. हेच काय पण राव, पंत, साहेब या मानार्थी संज्ञांवरही तो आपली मुद्रा उमटविताना दृष्टीस पडतो. जसे रावजी, पंताजी किंवा पंतोजी, साहेबजी. आर्यत्वदर्शक 'जी' हा शब्द महाराष्ट्रातून कमी होत चालल्याबद्दल राजवाडे हळहळ व्यक्त करतात. ब्राह्मण घरांतून भावजी, मामंजी, गुरूजी, भटजी असा तो तुरळक राहिलेला दिसून येतो. यादृष्टीने हिंदुत्ववादी सावरकर बंधूंनी आपणास तात्याराव, बाबाराव असे म्हणवून घेण्यापेक्षा तात्याजी, बाबाजी असा प्राचीन संकेत स्वीकारायला हवा होता. (राजवाडे;१९८०:२१६) 'जी' शब्दाच्या या श्रेष्ठत्वामुळेच आजच्या समाजकारणात व राजकारणात नावाच्या पुढे 'जी' शब्द लावण्यात येतो. विशेषत: हिंदुत्ववादी राष्ट्रीय स्वयंसेवक संघात तो अधिक दिसतो. उदा - भागवतजी. तसेच हिंदुत्वाचे समर्थन करणाऱ्या भारतीय जनता पक्षातही याचा वापर सर्रास आढळतो. उदा :- अटलजी, लालकृष्णजी, मोदीजी. इतकेच नव्हे तर बिगर हिंदुत्ववाद्यांमध्येही याचे आकर्षण दृष्टीक्षेपास येते. महाराष्ट्रातील नेते ज्यांचा मुरब्बी राजकारणी असा उल्लेख केला जातो, ते शरद पवार यांच्या नावापुढे शरदचंद्रराव नंतर 'जी' हा शब्द लावून तो शरदचंद्ररावजी असा विस्तारलेला दिसतो.

**वैदिक धर्म**

आहिताग्नि राजवाडे म्हणतात, वैदिक म्हणजे वेदापासून सिद्ध झालेला असा आपला धर्म आहे. 'वैदिक' आणि 'हिंदू' यांत जमीन-अस्मानचे अंतर आहे. वैदिक धर्मीय निराळा व हिंदूधर्मीय निराळा. वैदिक धर्म हा अतिप्राचीन इतिहासाच्या धुक्यात गडप झालेला आहे. याच वैदिक धर्मातून सर्व प्राचीन धर्म उद्भवले आहेत. वैदिक धर्म हा विश्वव्यापी धर्म आहे. तो सनातन आहे. म्हणजेच कधीही न मरणारा. सदोदित तारुण्यात असणारा, ज्याला वार्धक्य नाही,

शाश्वत असा हा वैदिक धर्म आहे. (राजवाडे;१९४७:२) तो मनुष्यकृत नाही.'वैदिक' हा शब्द भाववाचक, गुणवाचक आहे. या धर्मातील ज्ञान एका विशिष्ट व्यक्तीचे नाही. हे ज्ञान निर्माण करणाऱ्यांत वसिष्ठ, वामदेव, जमदग्नि, विश्वामित्र, अंगिरस, भारद्वाज इ. अनेक ऋषी आहेत. म्हणजे हा धर्म पुरुषदृष्ट आहे. हा उत्क्रांतीच्या ओघात सिद्ध होणारा धर्म आहे. (राजवाडे;१९४७:८) वैदिक धर्म हा श्रौतधर्म, यज्ञप्रधान धर्म आहे. तो ऋग्वेद, यजुर्वेद व सामवेद या तीन वेदांवर सिद्ध होतो. हा धर्म अनेकदेववादी धर्म आहे. वैदिक धर्म हा विशेष अध्यात्मपर असल्याने या धर्मात शंसन, स्तवन व दान या तिन्ही कर्माची आवश्यकता असते.

वैदिक धर्म हा गुणाने श्रेष्ठ धर्म आहे. तो वर्णबद्ध व जातिबद्ध असल्याने त्यात शुद्धी करून धर्मप्रवेश देणे शक्य नव्हते. म्हणजेच हा धर्म संरक्षणात्मक धर्म आहे. या धर्मात आश्रमधर्माचे पालनही अत्यंत कडक होते. गृहस्थाश्रम व वानप्रस्थाश्रम झाल्याशिवाय संन्यासाश्रम घेणे विहित नव्हते. याशिवाय प्राचीन वैदिक धर्मात एकट्या ब्राह्मण वर्गालाच संन्यास विहित होता. क्षत्रिय व वैश्य या वर्गांना संन्यास विहित नव्हता. याचे कारण असे की, संन्यासाश्रमात संन्याशाने भैक्षचर्य वृत्तीने राहावयाचे असते. ही वृत्ती क्षत्रिय व वैश्य या दोन्ही वर्गांनी स्वीकारायची नसते. (राजवाडे;१९४७:५८–६०)

आहिताग्नि राजवाडे यांच्या मते, 'वैदिक म्हणजे शुद्ध आर्य होत. ते आपल्या आकांक्षांना धरून सर्वथा यज्ञाचे अवलंबन करीत. ते केवळ यज्ञांतच स्वर्गाचे म्हणजे सर्व सुखाचे साधन पाहात. सर्व प्रकारे इहलोकाचा संसार साधावा म्हणून यज्ञावर त्यांचा कटाक्ष असे. यज्ञरूपी धर्मसंसार करून ऐहिक हित संपादण्यात ते परम पुरुषार्थ मानीत. अशा यज्ञात मुख्य महत्त्वाच्या तीन बाबी असत. १) अन्नसंपादन २) प्रजावर्धन ३) शत्रूहनन. वैदिक धर्मात यज्ञाचा अधिकार सर्वच श्रेष्ठकनिष्ठ स्त्री पुरुषांना सरसकट सारखा नाही. तर, केवळ ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य या त्रैवर्णिकांनाच आहे. त्यातही यज्ञाचा अधिकार गृहस्थाश्रमींनाच होता. विधवा, अपंग, क्षुद्र, अविवाहित, तृतीयपंथीय यांना नव्हता. वैदिक धर्मात स्त्रीला पुरुषांबरोबरचे स्थान होते. यज्ञविधीत पुरुषाइतकाच स्त्रीला अधिकार होता. वैदिक स्त्रीच्या जवळ स्वत:चे स्वयंभू धन असल्याने ती निर्धन नाही तर पूर्णपणे ईश होण्याच्या योग्यतेची आहे. मूळ वैदिक परंपरेप्रमाणे स्वर्ग अधिभौतिक आहे. तो यज्ञाने प्राप्त होतो. मनुष्याला जन्मांतर आहे. या जन्मी केलेल्या कर्माचे फळ पुढील जन्मी मिळते. यज्ञ हा जसा व्यापक आहे, तसे त्याचे फल जो स्वर्ग तो ही अत्यंत व्यापक आहे. अग्नी, वायू, सूर्य यांना वैदिक देव मानीत व देवांना द्रव्याचे हवि देताना अग्नीच्या ज्वालेत त्यांच्या मूर्ती पाहात.' (राजवाडे;१९४९ (ब):१७०–१९१)

वैदिक धर्म म्हणजे केवळ यज्ञ होय. वेदोत्तरकालीन धर्मात यज्ञाव्यतिरिक्त भक्ती, उपासना, हे दुसरे अनेक मार्ग शिरले. ते यज्ञाला धरूनच होते. त्यांचा यज्ञाशी केव्हाच विरोध नव्हता. वेदांनी जो धर्म स्थापन केला तो केवळ यज्ञसंस्थेने अन्वित होता व चातुर्वर्ण्यात राज्य व धर्म हे परस्पर संलग्न असल्याकारणाने राजांनी यज्ञसंस्था पूर्णपणे मान्य केली. यज्ञतत्त्व नैसर्गिक आहे. तशीच यज्ञाला मूर्त स्वरूप देण्याची कल्पनाही मनुष्याच्या मूळ विकारानुसार उद्भवत असल्यामुळे नैसर्गिक आहे. यज्ञगुण म्हणजे सद्गुण. यज्ञगुण प्राप्त करून घेण्याची मनुष्यात निसर्गत: शक्ती आहे. यज्ञाचा अभ्यास करून त्यात त्याला निपुणता येण्याकरिता सतत यज्ञकर्मे व्हावी, यासाठी समाजात यज्ञसंस्थेची जरूरी आहे. ॲरिस्टॉटलने मनुष्याच्या ठायी सद्गुणांची सिद्धी होण्याकरिता त्याच्या कर्माला योग्य गती देणाऱ्या संस्थांची समाजात आवश्यकता असते, असे म्हटले आहे. त्यानुसार त्याने राज्यसंस्था हीच एक प्रमुख संस्था घेऊन तिचा उहापोह आपल्या नीतीशास्त्राला जोडून राज्यशास्त्रात केला आहे. त्याप्रमाणेच वेदांनी यज्ञाचा धर्मात अंतर्भाव करून त्याद्वारे मनुष्यमात्राच्या अंगी यज्ञगुण सिद्ध करण्याकरिता यज्ञसंस्था स्थापन केली होती. यज्ञसंस्था म्हणजे प्रत्यक्ष सद्गुणसंस्था होय. ही संस्था स्थापन करण्यात वेदांचे अगाध चातुर्य दिसून येते. (राजवाडे;१९१६:२६१–२६५)

वैदिक तत्त्वज्ञान जगत्निर्मिती मानते. जगत् ही भोग्य वस्तू आहे. भोक्ता परमेश्वर आहे. म्हणून भोग ईशाचा घ्यावयचा नाही तर ईश होऊन जगताचा घ्यावयाचा. त्यासाठी भगवंतांनी गीतेत फलत्यागपूर्वक कर्माचरण सांगितले आहे. अर्थात तेथे जसा त्याग आहे, तसा भोग आहे. आणि जसा संन्यास आहे, तसे कर्म आहे. त्याग फलाचा व भोग जगताचा म्हणजे कर्माचा. म्हणजे भगवंतांनी जो जगत् सोडतो आणि कर्म टाकतो त्याला त्यागी म्हटले नाही, तर जो केवळ कर्मफलत्याग करतो, त्याला त्यागी म्हटले आहे. (राजवाडे;१९४९(अ):८१–८२)

अशाप्रकारे वेद व यज्ञ यांना मानणारा वैदिक धर्म वर्ण व जातिव्यवस्थेचे समर्थन करून श्रेष्ठकनिष्ठभाव स्वीकारणारा, ब्राह्मणांचे श्रेष्ठत्व प्रतिपादित करणारा, त्यागापेक्षा कर्माला अधिक महत्त्व देणारा, पुनर्जन्मावर विश्वास ठेवणारा, मूर्तीपूजेचे स्तोम न माजवणारा, यज्ञविधीत स्त्रीला पुरुषाबरोबरचे स्थान देणारा सनातन धर्म असल्याने तो आहिताग्नि राजवाडे यांना अतिप्रिय होता.

**हिंदू धर्म**

राजवाडे यांना हिंदू धर्माविषयी आत्मीयता व अभिमान होता. त्यांच्या मते,'हिंदू धर्म हा वैदिक धर्माचा वंशज आहे. वैदिक धर्मावर आक्रमणे होऊन त्यांचा प्रतिकार करता करता जे रूप शिल्लक राहिले, तो हिंदू धर्म असे ऐतिहासिकदृष्ट्या म्हणता येईल. पण हिंदू धर्माची व्याख्या करावयाची म्हणजे फारच मोठी पंचाईत आहे. वस्तुस्थिती अशी आहे की हिंदू धर्माची निश्चित अशी व्याख्या करता येत नाही. हिंदू धर्म म्हणजे सतरा ठिगळांची गोधडी आहे. त्यास निश्चित गुणकर्म नाही.' (राजवाडे;१९४७:३४-३५) शिवकाळात गोब्राह्मण प्रतिपालक तो हिंदू अशी हिंदूंची व्याख्या होती. ही व्याख्याही मागे पडली. लोकमान्य टिळकांनी 'प्रामाण्यबुद्धिर्वेदेषु' व 'साधनानामनेकता' अशी हिंदूधर्म या शब्दाची व्याख्या केली आहे. पण आज वेदांवरील श्रद्धा हे हिंदूधर्माचे लक्षण मानले जात नाही. यामुळे टिळकांची हिंदूधर्माची व्याख्या मागे पडली. राजवाडे यांनी 'ब्राह्मण वर्ज्य करून गोप्रतिपालक तो हिंदू' अशी हिंदूंची व्याख्या केली. (राजवाडे;१९८०:२५६)

राजवाडे यांच्या मते,'जगातील सर्व धर्मांत हिंदूधर्म हाच एक असा आहे की, ज्याला कोणी धर्मसंस्थापक नाही. विशिष्ट असा एकमेव देव व ग्रंथ नाही. गेली कित्येक शतके तो परकीय परधर्मी राजांच्या सत्तेखाली कसाबसा तग धरून होता. स्वातंत्र्यानंतरही हिंदू धर्माला मानाचे स्थान मिळाले नाही. कारण, आपल्या देशाने धर्मनिरपेक्षतेचा पुरस्कार केला. वास्तविकरित्या हिंदू धर्म 'स्वधर्मे निधनं श्रेय: परमोधर्मो भयावह :' या तत्त्वावर उभारलेला अत्यंत निरुपद्रवी, दुसऱ्या कोणत्याही धर्मावर आक्रमण न करणारा, केवळ आपल्या स्वत:च्या रक्षणापुरती दृष्टी ठेवणारा, असा परमसहिष्णू आणि सोज्वळ आहे.' (राजवाडे;१९८०:२५७)

हिंदू धर्म वर्णबद्ध व जातिबद्ध धर्म आहे. हा धर्म मूर्तीपूजक आहे. या धर्माचा पुनर्जन्मावर विश्वास असल्याने त्यात स्वर्ग, नरकाची कल्पना आहे. हा धर्म श्रेष्ठ – कनिष्ठाभावाचा पुरस्कर्ता आहे. बौद्ध व ख्रिश्चन धर्माच्या प्रभावामुळे हिंदू धर्मात स्त्रीला दुय्यम स्थान दिले गेले. (राजवाडे;१९४९ (ब):१७९) हिंदू धर्म हा एकसंध, एकात्म असा धर्मसंप्रदाय नाही. तो एकमेकांत गुंफलेल्या, एकमेकांत सरमिसळू शकणाऱ्या पण तरीही स्वत:चे वेगळेपण टिकविणाऱ्या अनेक धर्मसंप्रदायाचा एक व्यूह आहे. या साऱ्यात एकत्र गुंफणारा एकच धागा शोधणे अवघड आहे. कारण, शंकराचार्यांपासून ते सावरकरांपर्यंत किंबहुना त्यानंतरही अनेकांनी आपल्याला सोयीस्कर अशी हिंदू धर्माची पुनर्मांडणी केलेली दिसते. राजवाडे नेमके यावरच बोट ठेवतात.

शंकराचार्यांचे तत्त्वज्ञान 'द्वैत – अद्वैत'1 यावर आधारित आहे. शंकराचार्यांनी द्वैताद्वैत – द्वंद्वातील एकेका अद्वैत व द्वैत कोटीची निरपेक्षरित्या एकांगी कल्पना लादून वेदातील प्राचीन तत्त्वज्ञान विकृत करून टाकले आहे. शंकराचार्यांच्या तत्त्वज्ञानावर संन्यासाचा प्रभाव आहे. गीतेत किंवा ब्रह्मसुत्रात कोठेही द्वैताद्वैत याचा उल्लेख नाही. गीतेत व ब्रह्मसुत्रात द्वंद्वनिर्द्वंद्वाचे तत्त्वज्ञान आहे. शंकराचार्यांचे सांप्रदायिक अनुयायी 'द्वैत' म्हणजेच 'द्वंद्व'[२] व 'अद्वैत' म्हणजेच 'निर्द्वंद्व'[३]

---

[१] अद्वैत म्हणजे द्वैताचा अभाव. जे द्वैत नव्हे, ते. द्वैत म्हणजे जे द्विधाभूत होऊन दोनपणांत आले ते. द्विधा होणे म्हणजे एकाचे तुटून दोन तुकडे पडणे. अशा द्वैधीभवनात दोन्ही तुकडे समान गुणधर्माचे असतात. जसे, नदीचा एक ओघ दोन पात्रात फुटणे आणि त्याचे दोन ओहोळ बनणे. (राजवाडे;१९४९(अ):१३४)

[२] द्वंद्व निराळे द्वैत निराळे. जगतात द्वैत नाही. द्वंद्व आहे. द्वंद्वात जसे द्वैत आहे, तसे त्याला प्रतियोगी अद्वैत आहे. म्हणजे, द्वैताच्या अपेक्षेने अद्वैत आणि अद्वैताच्या अपेक्षेने द्वैत आहे. द्वैतात दोनत्व आहे आणि द्वंद्वातही दोनत्व आहे. पण द्वैतातील दोन समान गुणधर्माचे असतात तर द्वंद्वातील दोन विषम गुणधर्माचे असतात. (राजवाडे;१९४९(अ):१३५)

[३] व्यक्त आणि अव्यक्त हे द्वंद्व आहे. तसेच, कारण आणि कार्य, पूर्ण आणि अपूर्ण, स्थिर आणि चल, अजगत् आणि जगत्, स्थिती आणि गती, अस्ति आणि भवती ही सर्व द्वंद्वेच होत. या द्वंद्वाची स्फुटता जगतात आहे. कारण, जगतातच त्यातील दोन्ही कोटी विभक्त होऊन कार्यकारी होणाऱ्या आहेत. जगताच्या बाहेर अजगत् स्थितीत ह्या उभय कोटी अविभक्त राहतात. अशा एका अद्वितीय अविभक्ताला 'निर्द्वंद्व' ही संज्ञा यथार्थ लागू पडते. हे निर्द्वंद्व कसे? तर द्वंद्वाच्या दोन दोन कोटी विभक्त करून त्यांना कार्यकारी करण्याचे सामर्थ्य ज्याच्या ठिकाणी आहे असे. हे निर्द्वंद्व जगत्भावात द्वंद्वातील दोन दोन कोटींत स्फुट झालेले असो वा अजगत्भावात आपल्या शुद्ध अविभक्त स्थितीत अस्फुट राहिलेले दिसो; ते पूर्ण आहे, एक आहे. अद्वितीय आहे, त्यात संशय नाही. किंबहुना पूर्ण आहे, म्हणून 'एकमद्वितीयं' आहे किंवा 'एकमद्वितीयं' आहे म्हणून पूर्ण आहे. (राजवाडे;१९४९ (अ):३)

अशाप्रकारे आपल्या मताचे समर्थन करतात. पण या शब्दांच्या अर्थात जमीन-अस्मानाचे अंतर असल्याने राजवाडे शंकराचार्यांच्या प्रत्येक मुद्याचे शास्त्रांच्या आधारे खंडन करून या द्वैताद्वैताचार्याचे एकांगी मार्ग पूर्णपणे वैदिक परंपरेला सोडून बौद्ध व ख्रैस्त्य वळणावर गेले आहेत हे नि:संदिग्धपणे विशद करतात. (राजवाडे;१९४९(अ):६)

गीतेच्या तत्त्वज्ञानाप्रमाणेच राजवाडे यांच्या तत्त्वज्ञानात निर्द्वंद्वाला मध्यवर्ती स्थान आहे. राजवाडे जसे शंकराचार्यावर टिकेचा भडिमार करतात, तसेच हिंदुत्ववादी वि. दा. सावरकरांबाबतही ते आक्षेप घेतात. सावरकरांनी 'आसिंधुसिंधुपर्यंता थस्थ भारतभूमिका। पितृभू: पुण्यभुचैव स वै हिंदुरिति स्मृत:।।' म्हणजे ज्याची पितृभूमी आणि पुण्यभूमी भारत आहे, तेच हिंदू अशी हिंदूंची व्याख्या केली. ही व्याख्या जैन, बौद्ध, शीख यांना हिंदू ठरवते तर ज्यू, पारशी, मुसलमान, ख्रिश्चन यांना अहिंदू ठरविते. राजवाडे यांच्या मते, 'सावरकरांची ही व्याख्या देशाला धरून आहे. धर्माला धरून नाही.' (राजवाडे;१९४७:३४-३५) सावरकरांचा हिंदुत्ववाद कडवा हिंदुत्ववाद आहे. तो मुस्लिमद्वेषी आहे. सावरकर आपला पहिला शत्रू मुस्लिम आणि दुसरा इंग्रज मानत. सावरकरांचा हा मुस्लिमद्वेष पाहून राजवाडे सावरकरांना 'मुसलमानफोबिया' झाला आहे, असे म्हणत. राजवाडे यांच्या मते,'या देशाला खरी भीती इंग्रजांची होती. कारण तो आपल्यापेक्षा शस्त्रास्त्राने बलाढ्य आहे. मुसलमान आपल्यासारखाच बलहीन. थोडा तो शिरजोरी दाखवी व मगरूरी करी ती इंग्रजाच्या बळावर.' (राजवाडे;१९८०:२१३) सावरकरांनी हिंदू धर्माच्या एकजुटीसाठी रोटीबेटीव्यवहार, मंदिरप्रवेश इत्यादी कार्यक्रमांचा पुरस्कार केला. तसेच राजकीय स्वार्थासाठी सावरकरांनी हिंदुत्व विचारसरणीत वेळोवेळी बदल केला असे राजवाडे यांचे मत असल्यामुळे ते सावरकरांचा खरपूस समाचार घेत.

काँग्रेस व हिंदू महासभेला हिंदू धर्माशी फारसे देणेघेणे नव्हते, असे राजवाडे मानत. काँग्रेस काय किंवा हिंदू महासभा काय धर्माच्या दृष्टीने दोन्ही संस्था सारख्याच. फार तर 'दगडापेक्षा वीट मऊ' म्हणता येईल इतकेच. बाकी प्रत्यक्षात धर्माला दोहोंचा काही उपयोग नाही. काँग्रेसने तर स्पष्ट निधर्मी राज्य पुकारून व इतर धर्मांत हस्तक्षेप न करण्याची भूमिका घेऊन एकप्रकारे हिंदू धर्मावर हल्ले चढवले आहेत. हिंदू महासभेस तर धर्मापेक्षा राजकारणच महत्त्वाचे वाटत आहे. अर्थात तो आता हिंदू नावाखाली शुद्ध राजकीय गट बनला आहे. जसा काँग्रेसचा गट तसा हा आणि जशी काँग्रेसला त्या नावाखाली जातपात राहिली नाही, तशीच यालाही हिंदू नावाखाली निराळी जातपात राहिली नाही. काँग्रेसने प्रौढ मतदानाच्या निवडणुकीत ज्याप्रमाणे मनुष्याची व्याख्या 'जो आपणास मनुष्य म्हणवून घेईल, तो मनुष्य' अशी केली, त्याप्रमाणे हिंदू महासभेने हिंदूंची व्याख्या'जो आपणास हिंदू म्हणवून घेईल, तो हिंदू' अशी केली. (राजवाडे;१९८०:२७६-२७७)

या देशातील हिंदू धर्माची व हिंदू महासभेची अवस्था पाहून राजवाडे उद्विग्न होतात. हिंदू महासभेला लोकमान्य टिळकांसारखा कणखर पुढारी मिळाला पाहिजे, असा भाबडा आशावाद ते व्यक्त करतात. इतकेच नव्हे; तर हिंदू महासभेला असा कणखर नेता परमेश्वर लवकर देवो आणि हिंदू धर्माचे पांग फेडणारा खरा वीर देशात निर्माण होवो, अशी प्रार्थना करतात.(राजवाडे;१९८०:२८६) या देशात कोणत्याही राजकीय पक्षाला हिंदू धर्माचे वावडे नाही, तसे ते राज्यालाही नाही. हे राज्य हिंदू धर्मियांसाठी लाभदायक असे काही करू शकत नाही व हिंदूंना व्यवस्थित जगूही देत नाही. द्विभार्याप्रतिबंधक कायदा करून या राज्याने हिंदू धर्मावर घाला घातला आहे. वेदात बहुपत्नीविवाहास मान्यता असताना राज्याने हा कायदा करून ख्रिस्ती अनुकरण केले आहे. राजवाडे यांच्या मते, 'याचा परिणाम लोकसंख्येवर होईल. आज मुसलमानांची संख्या चक्रगतीने वाढत असून, त्याच प्रमाणात हिंदूंची व विशेषत: ब्राह्मणांची किंवा उच्चवर्णीयांची लोकसंख्या घटत आहे. सुजननशास्त्राच्या दृष्टीने हे अतिशय घातक आहे. द्विभार्याप्रतिबंधक कायदा मुसलमानांना लागू न करता फक्त हिंदूंनाच लागू करण्यात मोठा अनर्थ आहे.' (राजवाडे;१९४७:५६-५७)

**इस्लाम धर्म**

आहिताग्नि शंकर रामचंद्र राजवाडे कट्टर हिंदुत्ववादी होते. पण सावरकरांच्या हिंदुत्वात जो मुस्लिमद्वेष दिसतो, तो राजवाडेंच्या हिंदुत्वात दिसत नाही. राजवाडे इस्लाम धर्मातील काही प्रथा - परंपरांवर टीका करतात त्याबरोबरच ते इस्लाम धर्मातील चांगल्या गोष्टींची मुक्तकंठाने प्रशंसा करतात हे राजवाडे यांचे वेगळेपण होय.

---

'निर्द्वंद्व हे जगतातील सर्व वस्तुजात ओतप्रोत व्यापून जगताच्या बाहेर अपरंपार आहे. ते पूर्ण आहे, नित्य आहे, शाश्वत आहे, पुराण आहे. त्यात खंड नाही, अंतर नाही, चलन नाही, बदल नाही. परंतु, ते जगतातील बदलण्याला, चलन पाडण्याला आणि खंड करण्याला एकच एक कारणीभूत आहे. ते द्वंद्वातील निर्द्वंद्व म्हटले म्हणजे सर्व आहे व सर्व नाही - नाहीच्या पार आहे.'(राजवाडे;१९४९ (अ):४४१)

मुस्लिम स्वत:स त्यांचा देव अल्लाह, प्रेषित महंमद पैगंबर आणि ग्रंथ कुराण या तीन गोष्टींवर मुसलमान म्हणवतो.[४] हिंदू व मुसलमान हे अगदी एकमेकांच्या विरुद्ध आहेत. हिंदू आपल्या डाव्या बाजूने अक्षर लिहिण्यास सुरुवात करतो, तर मुसलमान उजव्या बाजूने सुरुवात करतात. हिंदूच्या ग्रंथाचा आरंभ पहिल्या पानापासून असतो, तर मुसलमानांच्या ग्रंथाचा आरंभ शेवटच्या पानापासून होतो. हिंदू सकाळपासून दिवस मोजतो, तर मुसलमान सायंकाळपासून मोजतो. हिंदू सकाळी सूर्योदयानंतर तोंड धुतो व ते वरून खाली धुतो. स्नान करताना हिंदू पाय आधी धुतो व नंतर डोके धुतो, तर मुसलमान डोके आधी धुतो आणि पाय नंतर धुतो. हिंदूंच्या बंडीचे बंद हे डावीकडे असतात, तर मुसलमानांचे उजवीकडे असतात. हिंदू वेगवेगळ्या स्वतंत्र ताटात जेवतो, तर मुसलमान एकाच थाळीत हात घालून जेवतो. हिंदू आपली भाकरी तव्याच्या खोलगटात भाजतो, तर मुसलमान उपड्या तव्यावर भाजतो. हिंदू संगीतकार आपली वीणा (सतार वाद्य) आतून बाहेर वाजवतो, तर मुस्लिम संगीतकार बाहेरून आत वाजवतात. हिंदू हा शेंडी ठेवतो व दाढी काढतो, तर मुसलमान हा दाढी ठेवतो व मिशी काढतो. हिंदू धर्म हा जातिबद्ध असल्याने एकेकट्या व्यक्तीला हिंदू धर्मात घेणे कठीण आहे, तर मुस्लिम धर्म एकवर्णी असल्याने इतर धर्मातील कोणत्याही व्यक्तीला आपल्या धर्मात घेणे त्यांना सोपे आहे. (राजवाडे;१९४७:५३-५८)

इस्लाम धर्मात स्वर्ग व नरकाची कल्पना आहे. पण या धर्मात पुनर्जन्माचे तत्त्व नाही. विवाह व घटस्फोट हे विधी अतिशय सोपे व सुटसुटीत आहेत. इस्लाम धर्म निकृष्ट दर्जाचा आहे. कारण या धर्मात गंध, रस व स्पर्श या इंद्रियावर भर आहे. रूप व शब्द या उच्च गुणांवर नाही. गायन व चित्र इस्लाम धर्मानुसार अधर्म होत. रसनेंद्रिय व स्पर्शेंद्रिय यावरच इस्लाम धर्माचा भर आहे. नेत्र व कर्ण या उच्च इंद्रियांना या धर्मात स्थान नाही. पण मानवाची संस्कृती ही याच दोन इंद्रियांद्वारे पूर्णत्वाला जाते. (राजवाडे;१९४७:१३०-१३१)

हिंदू व इस्लाम धर्मातील बऱ्याचशा गोष्टी परस्परविरोधी आहेत. पण इस्लाम धर्माचा मुख्य पवित्र ग्रंथ 'अल् कुराण'च्या पहिल्या अध्यायातील संपूर्ण विषय हा मूळ ऋग्वेदातील अंतिम मंत्राचा जशास तसा अनुवाद आहे, असे दाखवून देऊन राजवाडे कुराणातील सुराची मुक्त कंठाने स्तुती करतात. ते म्हणतात,'मुसलमान सुरा म्हणताना आकाशाकडे तळहात वर करून तो तोंडावरून खाली ओढत आणतात. जणू देवाचा कृपाप्रसाद हातावर झेलून तो सर्व शरीरात प्रसृत करायचा हा प्रकार आहे. या सुरात सात आयात म्हणजे महावाक्ये आहेत व त्या सात सजा म्हणजे ऋचा आहेत. या सात ऋचांत परमेश्वराचे स्तुतीपूर्वक गुणवर्णन आहे.' (राजवाडे;१९४९(अ): ६७१-६७८)

१९४७ साली धर्माच्या आधारावर पाकिस्तानची निर्मिती झाली. स्वतंत्र पाकिस्तान घेतल्यानंतर मुस्लिमांना भारतात राहण्याचे कारण नव्हते असे राजवाडे यांचे मत होते. याचा अर्थ या ठिकाणी राजवाडे मुस्लिमांचा द्वेष करतात, असे नाही. तर राजवाडे यांना देशाची फाळणी अमान्य होती. ते म्हणतात,'काँग्रेसने देशाची फाळणी करून फार मोठी चूक केली आहे.' मात्र फाळणी झाल्यानंतर धर्माच्या आधारावर राज्य देऊनही निम्म्यापेक्षा अधिक मुस्लिम भारतातच राहतात हे राजवाडे यांना संयुक्तिक वाटत नाही.(राजवाडे;१९८०:२७६) मात्र इस्लाम धर्म स्वराज्याकरिता आपल्या धर्मातील एकही बाब सोडण्यास तयार नव्हता.[५] या गोष्टीचे राजवाडे यांना अप्रूप वाटते.

**बौद्ध धर्म**

बौद्ध धर्माचे संस्थापक गौतम बुद्ध. त्यांचा जन्म वाराणसीच्या कपिलवस्तू नगरीजवळ लुंबिनी नावाच्या वनात झाला. त्यांच्या वडिलांचे नाव शुद्धोधन व आईचे नाव माया होते. मायादेवीला जो सिद्धार्थ नावाचा पुत्र झाला, तोच पुढे बुद्ध म्हणून प्रसिद्धीस आला. क्षत्रिय वर्णात जन्मास आलेला हा गौतम बुद्ध केवळ राजपुत्रच नव्हता तर एका श्रीमंत जमीनदाराचा मुलगा असल्याने त्याच्या अंगी जन्मत:च वैयक्तिक श्रेष्ठत्वाची कल्पना पूर्णपणे बिंबली होती. परंतु त्याबरोबरच त्याच्या मनोवृत्ती अत्यंत कोमल होत्या. प्रामुख्याने धर्मप्रवर्तकाच्या अंगी जे दोन गुण असावे लागतात, ते

---

[४] मुस्लिम धर्म हा एकेश्वरवादी आहे. 'अल्लाह' हा त्यांचा एकमेव देव आहे. महंमद पैगंबर प्रेषित आहे. तर, त्यांचा ग्रंथही एकच आहे, तो म्हणजे,'अल् - कुराण.' या तीन गोष्टींना मानणारा मुसलमान होय. (राजवाडे;१९४७:३५ )

[५] भारतात ब्रिटिश आल्यानंतर सुधारणेला सुरुवात झाली. इंग्रजी विद्या शिकलेल्या तरुणांनी यास सकारात्मक प्रतिसाद दिला. यामुळे ब्रिटिशांनी सामाजिक व धार्मिक सुधारणा करण्यास सुरुवात केली. हिंदू धर्मियांनी सुरुवातीला यास विरोध केला. पण नंतर सुधारणेला प्रतिसाद दिला. आपल्या धर्मातील अनेक अनिष्ठ प्रथा - परंपरा बंद केल्या. त्या तुलनेत इस्लाम धर्मियांनी मात्र सुधारणेला विरोध केला. धर्मात तडजोड करणे त्यांनी साफ नाकारले. इतकेच नव्हे; तर स्वातंत्र्यानंतर भारताने धर्मनिरपेक्षतेचा पुरस्कार केला. याउलट पाकिस्तानी मुस्लिमांनी मात्र त्यांचा प्रांत निर्हिंदू करण्याचा निश्चय केला व त्या मार्गाने कारवाया चालविल्या.(राजवाडे;१९८०:२७६)

त्याच्या अंगी होते. तो राजघराण्यात ऐषआरामात वाढला. त्याचा विवाह झाला. त्यास एक मुलगा झाला. त्याचे नाव राहुल. पण बुद्धाचे मन संसारात रमेना. आपल्या राज्यात फिरत असताना त्याने पीडित मनुष्य पाहिला. एक रोगी पाहिला. एक प्रेतयात्रा पाहिली. त्याला सर्व संसार दु:खमय दिसू लागला. या दु:खापासून कसे मुक्त होता येईल, याचा विचार करत असताना त्याने एक विरक्त संन्यासी पाहिला व त्याचा परिणाम त्याच्या मनावर झाल्याने त्याने संसारत्याग करून अरण्यवास स्वीकारला. योगसाधना केली. तपश्चर्या केली व बोधीवृक्षाखाली त्यास ज्ञानप्राप्ती झाली.

गौतम बुद्धास ज्ञानप्राप्तीत चार धर्मतत्त्वे आढळली. १) संसार दु:खमय आहे. २) दु:खाचे मुख्य कारण तृष्णा आहे. ३) दु:खापासून सुटका करून घेण्यासाठी तृष्णेचा त्याग केला पाहिजे. ४) तृष्णेचा त्याग करण्यासाठी पुढील अष्टगुणात्मक उपायांचे पालन केले पाहिजे. १) योग्य श्रद्धा २) योग्य निश्चय ३) योग्य भाषण ४) योग्य कर्म ५) योग्य आचरण ६) योग्य प्रयत्न ७) योग्य विचार ८) योग्य निरोध. या अष्टगुणात्मक उपायातच बुद्धाची सर्व नीती आहे व या नीतीच्या आधारेच बुद्धांनी बौद्ध धर्माची स्थापना केली आहे.

राजवाडे यांच्या मते, 'बुद्धाचा निर्वाणवाद हा पूर्ण नास्तिकवाद आहे. तो शुद्ध शास्त्रीय बुद्धीने किंवा तात्त्विक बुद्धीने निर्माण झाला नसून वैदिक धर्माच्या विरुद्ध सूडबुद्धीने निर्माण झाला आहे. तसेच या धर्माचे तत्त्वज्ञान ब्रह्मविद्येच्या विरुद्ध आहे. ब्रह्मविद्येतील निर्वाणात ब्रह्माचे अस्तित्व व ब्रह्माचे पूर्णत्व आहे. तर बुद्धाच्या निर्वाणात ब्रह्माचे नास्तित्व व ब्रह्माचे शून्यत्व आहे. ॲरिस्टॉटलचे अंतिम सुखमय आहे व गीतेतील ब्रह्मही सुखमयच आहे. परंतु बुद्धाच्या सर्व नीतीचे अंतिम दु:खमयच आहे. म्हणून बुद्धाचा निर्वाणवाद हा शून्यवाद आहे. त्यात दु:खभाव असला, तरी सुख नाही. व्यष्टि असली, तरी समष्टी नाही. निर्वाण असले तरी ब्रह्म नाही.' (राजवाडे;१९१६:३०१-३०२)

गौतम बुद्धांना वर्णाश्रमधर्मातील वर्णभेद, जातिभेद व आश्रमव्यवस्था मान्य नव्हती. त्यांनी अर्ह, भिक्षु व उपासक असे तीन आश्रम काढून केवळ गुणांवर श्रेष्ठकनिष्ठभाव स्थापन केला. बुद्धांनी वर्णभेद व जातिभेद अमान्य करून समतेचे तत्त्व निर्माण केले. पण गुणांवर श्रेष्ठकनिष्ठभाव निर्माण करून परमार्थिक विषमता निर्माण केली. (राजवाडे;१९१६:३१३) बौद्ध धर्मात घर सोडणे, मठात राहणे, विवाह न करणे, विवाह झाल्यास स्त्रीपुत्रांचा त्याग करणे हे विरक्तीचे प्रमुख मार्ग होते. बौद्ध धर्म हा त्यागावर आधारित होता. बौद्ध धर्मात संन्यास घेण्यास सर्वांना परवानगी होती. अहिंसा हे बौद्ध धर्मातील प्रमुख तत्त्व होते. अशाप्रकारे बौद्ध धर्मातील तत्त्वे व शिकवण पूर्णपणे वैदिक धर्माच्या विरुद्ध असल्याने आहिताग्नि राजवाडे बौद्ध धर्मावर कडाडून टीका करतात.

**ख्रिश्चन धर्म**

भारतात इंग्रजी व्यापाऱ्यांच्या पाठोपाठ ख्रिश्चन मिशनरीही आले. भारतातील तत्कालीन धर्मभोळेपणा, अनेकदेववाद, विविध धर्मग्रंथ, त्यांच्यातील वितंडवाद, जातीपातीने पोखरलेला समाज, अंधश्रद्धा, रूढी, परंपरा यांनाच धर्म समजणे आदी वैगुण्ये ब्रिटिश राज्यकर्ते, ख्रिश्चन मिशनरी व विद्वान यांच्या लक्षात आली. प्रथम सुधारणा म्हणून त्यांनी शिक्षणावर भर दिला. शिक्षणाबरोबरच मिशनऱ्यांनी ख्रिश्चन धर्माच्या प्रसारास सुरुवात केली. ते हिंदूंना धर्मांतर करण्यास भाग पाडू लागले. शिक्षणाच्या नावावर ते भारतीयांना ख्रिश्चन धर्माकडे आकृष्ट करू लागले. त्यांच्या धर्मातील मूल्ये भारतीयांवर बिंबवू लागले व हिंदूंना बाटवू लागले. या गोष्टीचा राजवाडे यांना फार संताप येई. त्यामुळे ते ख्रिश्चन धर्मावर परखड शब्दांत टीका करीत. राजवाडे म्हणतात,'पितृदेव, प्रेषित येशू, बायबल ग्रंथ या आधारावर ख्रिश्चन व्यक्ती स्वत:स ख्रिश्चन धर्माचा म्हणवून घेतो. भारतात ख्रिस्ती मिशनऱ्यांनी शाळा, रुग्णालये सुरू करून वेगवेगळ्या स्वरुपाची आमिषे दाखवून हिंदूंना बाटवण्याचा प्रयत्न केला. पण क्वचित काही नासमज असलेली लहान मुले व गरीब लोक वगळता कोणीही ख्रिश्चन धर्म स्वीकारला नाही.' या बाबतीत ख्रिश्चन मिशनऱ्यांनी आपले अनुभव लिहून ठेवले आहेत. डॉ. मॅकिगन यांनी आपल्या मतपत्रिकेत असे स्पष्ट नमूद केले आहे की,'जातिबद्ध हिंदू समाजातील लोकांना आपल्या ख्रिस्ती धर्मात आणणे अत्यंत कठीण बाब आहे.' (राजवाडे;१९४७:४६) राजवाडे म्हणतात,'ख्रिस्ती धर्मात देव अमूर्त आहे. पण यांना मूर्त देवात किंवा मूर्तिपूजेत केवढे तत्त्वज्ञान भरले आहे याची कल्पना नाही. त्यांच्या अमूर्त देवतेच्या कल्पनेत गांवढळपणापलीकडे काही नाही. आमच्या धर्मात तर देवाचा देव म्हणतात तो निर्गुण, निराकार अशी उच्च कल्पना आहे. पण ख्रिस्ती धर्मात अमूर्त देव सगुण कसा? हा मोठा विरोधाभास आहे. या धर्मात देवाच्या मूर्ती नाहीत तर तुमची प्रार्थना त्यांच्या कानावर कशी जाते, हा प्रश्न आहे.' (राजवाडे;१९४७:५१)

देवाची प्राप्ती करून देणारा तो धर्म, अशी देवधर्मविषयक ख्रिस्त्यांची कल्पना आहे. या देवाची प्राप्ती करून घेण्यासाठी त्यांना मध्यस्थ लागतो. ख्रिस्ती धर्मात उपासक स्वतंत्रपणे स्वत:चा उद्धार करून घेऊ शकत नाहीत. त्यांच्या मते, धर्मात देवाशी मानवाचा करार झाला आहे. अब्राहम ऐझेक याने एकदा देवाशी करार केला होता. त्यानंतर दोन हजार वर्षांनी मोझेस निर्माण झाला. त्याने देवाशी पुन: करार केला. त्यासाठी सिनाई पर्वतावर तो गेला व देवाला भेटून तो पुन्हा

परत आला. त्याला शिलेचे तक्ते मिळाले. त्यानंतर येशूने त्याच पर्वतावर जाऊन करार केला व त्यापासून दहा आज्ञा मिळाल्या. राजवाडे म्हणतात,'ज्याप्रमाणे आपण राशनच्या दुकानात जातो व आपले कार्ड पुन्हा नवीन करून घेतो त्याप्रमाणे हे दिसते.'(राजवाडे;१९४७:८६)

ख्रिश्चन धर्म एकदेववादी आहे. या धर्मात पुनर्जन्म नाही. पण स्वर्गाची कल्पना आहे. ख्रिस्ती हा मूलत: स्त्रियांचा द्वेष्टा असल्याने त्याच्या स्वर्गात स्त्रिया नाहीत. स्त्रियांविषयीच्या या धर्माच्या भावनाही कुत्सित आहेत. इतकेच नव्हे; तर ख्रिस्ती मिशनरी हिंदूंच्या एकसंध समाजात दुही निर्माण करीत होते. राजवाडेंच्या मते,'ब्राह्मण व ब्राह्मणेत्तर यांतील वैर ख्रिस्ती मिशनऱ्यांनी पिकवलेले होते.' (राजवाडे;१९१६:२४६) हिंदूंच्या धार्मिक व सामाजिक बाबतीतला ख्रिस्ती मिशनऱ्यांचा वाढता हस्तक्षेप राजवाडे यांना न रूचणारा होता. यामुळे ते ख्रिश्चन धर्मावर टीका करीत.

आहिताग्नि राजवाडे हे धार्मिक वृत्तीचे होते. त्यांना सर्व धर्मांप्रती आदर होता. आर्य धर्म, वैदिक धर्म, हिंदू धर्म, इस्लाम धर्म या धर्मांतील तत्त्वे व शिकवण यांचा ते आदर करत. पण बौद्ध आणि ख्रिश्चन धर्म हिंदू धर्मातील मूल्य व शिकवणुकीवर आघात करीत होते म्हणून राजवाडे या धर्मावर परखड शब्दांत टीका करीत.

**संदर्भ ग्रंथ**

१. आपटे वासुदेव गोविंद, १९६८, *मराठी शब्दरत्नाकर*, पुणे, आनंद कार्यालय प्रकाशन.

२. दीक्षित राजा, २००६, *'आहिताग्नि शंकर रामचंद्र राजवाडे'*, यशवंत सुमंत आणि द. दि. पुंडे (संपा.) महाराष्ट्रातील जातिसंस्थाविषयक विचार, पुणे, प्रतिमा प्रकाशन.

३. बेडेकर दि. के., १९९५, *धर्मश्रद्धा एक पुनर्विचार*, सातारा, सर्वधर्म अध्ययन केंद्र, प्राज्ञपाठशाळा मंडळ.

४. मोरे सदानंद, २००९, *'महाराष्ट्रातील पाश्चात्य तत्त्वज्ञानाचा अभ्यास'*, परामर्श (खंड ३०), नोव्हेंबर ते जानेवारी, पुणे विद्यापीठ, तत्त्वज्ञान विभाग.

५. मंडलिक माधुरी, २०१३, *१९ व्या शतकातील महाराष्ट्रातील हिंदू धर्मसुधारणा चळवळ*, पुणे, डायमंड पब्लिकेशन्स.

६. राजवाडे शं. रा., १९१६, *गीताभाष्य*, पुणे, आग्निहोत्रमंदिर.

७. राजवाडे शं. रा., १९३८, *वैदिकधर्म आणि षड्दर्शने अथवा चार विद्या व सहा शास्त्रे*, नागपूर, नागपूर विश्वविद्यालय.

८. राजवाडे शं. रा., १९४७, *सनातन वैदिक धर्मप्रवचनमाला*, पुणे, अग्निहोत्रमंदिर.

९. राजवाडे शं. रा., १९४९ (अ), *ईशावास्योनिषदभाष्य*, पुणे, अग्निहोत्रमंदिर.

१०. राजवाडे शं. रा., १९४९ (ब), *षड्दर्शनसमन्वय आणि पुरुषार्थमीमांसा*, पुणे, अग्निहोत्रमंदिर.

११. राजवाडे शं. रा., १९८०, *आहिताग्नि राजवाडे आत्मवृत्त*, पुणे, श्रीविद्या प्रकाशन.

१२. व्होरा राजेंद्र (संपा.), २०००, *परंपरा आणि आधुनिकता*, पुणे, प्रतिमा प्रकाशन.

१३. क्षीरसागर श्रीकृष्ण कें., १९७६, *तसबीर आणि तकदीर*, मुंबई, पॉप्युलर प्रकाशन.

14. Lederle Mathew, 1976, *Philosophical Trends in Modern Maharashtra*, Mumbai, Popular.